ICICI Home Finance

नोंदणीकृत कार्यालय: आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००५९, इंडिया

शाखा कार्यालय: प्रेमिसेस क्र. २०१, २रा मजला, वेस्ट व्ह्यू, आयसीआयसीआय बँक समोर, वीर सावरकर रोड, ठाणे-४००६०२

(नियम ८ (६) साठी परंतुके) पहा

स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८(६) चे परंतुकान्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

विशेषतः सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोंकडे गाण/प्रभारित आहे, जिचा **सांकेतिक कब्जा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ हमीदार/कायदेशीर वारसाचेनाव/ कर्ज खाते क्र.	तारण मत्तेचा तपशील सह काही असल्यास ज्ञात भार	थकीत रक्कम	राखीव किंमत इसारा अनामत रक्कम	मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख व वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
१	सुरेश सावजी पटेल (कर्जदार), मंगला सुरेश पटेल (सह-कर्जदार), विवेक सुरेश पटेल (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएएनइ००००१३८९१६८ आणि एलएचएएनइ००००१३८९१७८	फ्लॅट क्र. २७०२, २७वा मजला, बी विंग, कृष्ण बिल्डिंग, नीलकंठ पाम्स, गाव माजिवडे, घोडबंदर रोड जवळ, ठाणे पश्चिम, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र ४००६१५	रु. १,५८,६४,६९९/- डिसेंबर ०२, २०२३	रु. १,७७,२७,६६०/- रु. १७,७२,७७०/-	डिसेंबर १८, २०२३ स. ११.०० दु. ०३.००	डिसेंबर २७, २०२३ दु. ०२.०० दु. ०३.००

ऑनलाईन लिलाव हा लिलाव एजन्सी **ग्लोब टेकची** वेबसाईट **(युआरएल लिंक-https://BestAuctionDeal.com)** वर करण्यात येईल. गहाणदार/नोटीसी यांना **डिसेंबर २६, २०२३ रोजी सायं.** ५.०० पूर्वी पर्यंत पुढील व्याजासह एकूण थकबाकी भरण्याची अंतिम संधी देण्यात येत आहे, अन्यथा तारण मत्ता वरील वेळापत्रकाप्रमाणे विकण्यात येईल.

संभाव्य बोलीदारांनी **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड प्रेमिसेस क्र. २०१, २रा मजला, वेस्ट व्ह्यू, आयसीआयसीआय बँक समोर, वीर सावरकर रोड, ठाणे-४००६०२** येथे इसारा अनामत रक्कम (इअर) चा डिमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई मध्ये उल्लेखित) **डिसेंबर २६, २०२३ किंवा दु. ०४.०० पूर्वी** सादर करणे आवश्यक आहे. संभाव्य बोलीदारांनी नोंदणी प्रपत्राची स्वाक्षांकित प्रत आणि बोली, अटी आणि शर्तीचे प्रपत्र **डिसेंबर २६, २०२३ किंवा सायं. ५.०० पूर्वी आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड प्रेमिसेस क्र. २०१, २रा मजला, वेस्ट व्ह्यू, आयसीआयसीआय बँक समोर, वीर सावरकर रोड, ठाणे-४००६०२** येथे सादर करावे. इसारा अनामत रक्कम डिमांड ड्राफ्ट (डीडी) **मुंबई, ठाणे** येथे देय **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड-लिलाव** च्या नावे नॅशनलाईज्ड/शेड्युल्ड बँकेवरील असणे आवश्यक आहे.

निरिक्षण, लिलावाच्या अटी आणि शर्ती किंवा निविदा सादर करण्याच्या संदभातील पुढील कुठल्याही स्पष्टिकरणासाठी कृपया ०२२-६९९७४३०० वर **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड** यांना किंवा **आमचे विक्री आणि मार्केटिंग पार्टनर नेक्सझेन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड** यांना संपर्क करावा.

प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कोणतेही कारण न देता कोणातीही किंवा सर्व बोली फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया https://www.icicihfc.com/ यावर भेट द्या.

दिनांक: डिसेंबर ०९, २०२३ — **प्राधिकृत अधिकारी**

ठिकाण: ठाणे — **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा :

२१ वीणा चेंबर्स मॅझेनाईन मजला, दलाल स्ट्रीट, बॉम्बे स्टॉक एक्सचेंज जवळ, फोर्ट, मुंबई - ४०००२३,

ईमेल: ubin0553352@unionbankofindia.bank

ई-लिलाव विक्री सूचना (सरफैसी ॲक्ट अन्वये)

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतुदींन्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ३० दिवसीय ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार आणि हमीदारांना सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकती या तारण धनकोंकडे गहाण/प्रभारीत आहे, ज्यांचा प्रत्यक्ष कब्जा **युनियन बँक ऑफ इंडिया** (तारण धनको) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या खालील नमुद नुसार संबंधित कर्जदार आणि हमीदार यांचेकडून **युनियन बँक ऑफ इंडिया** (तारण धनको) ला थकीत संबंधित रकमेच्या वसुलीसाठी दिनांक **११.०१.२०२४ रोजी दु. १२.०० ते सायं ५.००** दरम्यान **''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे,'' जे काही आहे तेथे आहे'' आणि ''विना अवलंब तत्त्वाने''** विकण्यात येणार आहेत. राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम खाली नमूद नुसार राहिल. विक्रीसाठीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया **युनियन बँक ऑफ इंडिया** (तारण धनको) यांची वेबसाईट म्हणजेच **www.unionbankofindia.co.in** मध्ये पुरवलेल्या लिंकचा संदर्भ घ्यावा. बोलीदार वेबसाईट **https://www.ibapi.in** येथे देखील भेट देऊ शकतात. खालील नमूद मिळकती या संबंधित कर्ज खात्यामधील संबंधित रक्कम अधिक व्याज आणि इतर खर्चाच्या वसुलीसाठी **११.०१.२०२४ रोजी वेबसाईट** www.mstcecommerce.com **मार्फत** ''ऑनलाईन ई-लिलाव'' द्वारे विकण्यात येणार आहेत.

वेबसाईट https://www.mstcecommerce.com मार्फत ऑनलाईन ई-लिलाव

लिलावाची तारीख आणि वेळ : ११.०१.२०२४ रोजी दु. १२.०० ते दु. ०५.००

संच क्र.	ए) कर्जदारांचे नाव बी) शाखेचे नाव सी) मिळकतीचे वर्णन डी) मालकाचे नाव	ए) राखीव किंमत रुपयात बी) इसारा अनामत रक्कम (इअर) रुपयात	थकीत कर्ज रक्कम संपर्क व्यक्ती आणि मोबाईल क्र. निरिक्षणाची तारीख/वेळ	भार कब्जा सांकेतिक/ प्रत्यक्ष
१	**ए) हरितारा कन्स्ट्रक्शन कं.** **बी)** ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा **सी)** गाव जुचंद्र, जुचंद्र तलाव जवळ आणि चंडिका देवी मंदिर, नायगाव पूर्व, तालूका वसई, जि. पालघर, महाराष्ट्र ४०१२०८ येथे स्थित सर्व्हे क्र. ७/२, ७/४, ७/९, ९/१, ९/३ए, ९/३/बी/२, ९/३सी, ९/६, १२/२,१३/३, १३/७, १३/४, १०/३, १०/५, १०/८, ९/४ येथे एनए जमीन डी) **१. श्री. मेहूल दीपक ठाकूर** **२. श्री. सिद्धार्थ दीपक ठाकूर** **३. श्री. रोहन जयेंद्र ठाकूर** **४. कु. प्रियंका जयेंद्र ठाकूर** **५. श्री. रोहिल जयेंद्र ठाकूर** **६. श्री. सागर प्रविण राऊत**	ए) रु. २३,५०,००,०००.००/- बी) रु.२,३५,००,०००.००/-	३०.०६.२०२३ रोजीस रु. **१५,१२,४२,११८.५५ (रु. पंधरा करोड बारा लाख बेचाळीस हजार एकशे अठरा आणि पैसे पंच्यावन्न मात्र)** अधिक तारखेपर्यंत व्याजाच्या प्रयोज्य दराने ०१.०७.२०२३ पासूनचे त्यावरील पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार **श्री. अबिद अत्तर** - ९७६३७१०९४८ **श्री. पी एस मुलिक** - ८६६८१९६३७८	सांकेतिक कब्जा
२	**ए) मे. अक्षय एन्टरप्रायजेस.** **बी)** ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा **सी) ऑफिस परिसर येथे अंबे आशिष इमारत, २ रा मजला, रुम क्र. ७(समोर) दरियालाल मंदिर, ३२, दरिआस्थान स्ट्रीट, वाडगाडी, मस्झिद बंदर पश्चिम, मुंबई ४०० ००३** **डी) सौ. हर्षदा किरिट शाह**	ए) रु. २५,२५,०००.००/- बी) रु. २,५२,५००.००/-	**३१.१०.२०२३ रोजीस रु. ३०,४९,७३५.८२/- (रु. तीन लाख एकोणपन्नास हजार सातशे पस्तीस आणि पैसे ब्याऐंशी मात्र)** अधिक तारखेपर्यंत व्याजाच्या प्रयोज्य दराने **०१.११.२०२३** पासूनचे त्यावरील पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार **श्री. विजय भागवतकर** - ८६८९८२२२२७ **श्री. किशोर चंद्र कुमार** - ७९९२४६६९३०	प्रत्यक्ष कब्जा
३	**ए) श्री. सचिन राम सागवेकर** **बी)** ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा **सी)** फ्लॅट क्र. १०१, १ ला मजला, प्रथमेश सदन, पाल्म बिच हॉस्पिटल जवळ, जीईएस प्लॉट क्र. ७, सेक्टर १९-२०, गाव बेलापूर (फणसपाडा) सीबीडी बेलापूर नवी मुंबई, जिल्हा ठाणे महाराष्ट्र पिन ४००६१४ मोजमापित सुपर बिल्ट अप क्षेत्र ४०० चौ.फू. समाविष्ट मिळकतीचे सर्व ते भाग आणि विभाग **डी) श्री. सचिन राम सागवेकर**	ए) रु. ४०,००,०००.००/- बी) रु. ४,००,०००.००/-	**३१.१०.२०२३ रोजीस रु. ३३,८१,४८२.०४/- (रु. तेहेतीस लाख एक्याऐंशी हजार चारशे ब्याऐंशी आणि पैसे चार मात्र)** अधिक तारखेपर्यंत व्याजाच्या प्रयोज्य दराने **०१.११.२०२३** पासूनचे त्यावरील पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार **श्री. विजय भागवतकर** - ८६८९८२२२२७ **श्री. किशोर चंद्र कुमार** - ७९९२४६६९३०	प्रत्यक्ष कब्जा
४	**ए) मे. साई इलास्टो टेक्नॉलॉजीस** **बी)** ॲसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा **सी)** फ्लॅट क्र. ०४, तळ, इमारत क्र. ०३, दिनेश शालीभद्रा ग्राम सीएचएसएल, काशिमिरा, मिरा भाईंदर रोड, मिरा रोड पूर्व, ठाणे महाराष्ट्र, पिन ४०११०७, मोजमापित सुपर बिल्ट अप क्षेत्र २१७ चौ.फू. **डी) सौ. हेमलता शामनहाजी मातेरे**	ए) रु. २०,६२,०००.००/- बी) रु. २,०६,२००.००/-	**३१.१०.२०२३ रोजीस रु. ४२,३३,५२४.३१/- (रु. बेचाळीस लाख तेहेतीस हजार पाचशे चोवीस आणि पैसे मात्र)** अधिक तारखेपर्यंत व्याजाच्या प्रयोज्य दराने **०१.०८.२०१५** पासूनचे त्यावरील पुढील व्याज, परिव्यय आणि प्रभार **श्री. विजय भागवतकर** - ८६८९८२२२२७ **श्री. किशोर चंद्र कुमार** - ७९९२४६६९३०	सांकेतिक कब्जा

बोलीदारांना ई-लिलावात भाग घेण्यासाठी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी ई-लिलावाच्या तपशिलवार अटी आणि शर्ती आणि इतर तपशिलांसाठी बँकेची वेबसाईट: **www.unionbankofindia.co.in** ला भेट देण्याची विनंती करण्यात येत आहे. बोलीदार सेवा पुरवठादार इंडियन बँकस् ऑक्शन प्रॉपर्टीज इन्फर्मेशन (आयबीएपीआय) पोर्टलच्या **http://www.ibapi.in** ला सुध्दा भेट देवु शकतात.

इच्छुक बोलीदारांकडे ऑनलाईन लिलावामध्ये सहभागी होण्यासाठी वैध ईमेल आयडी असणे आवश्यक आहे. विक्रीच्या अटी आणि शर्ती या काटेकोरपणे सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ तरतुदींनुसार राहतील.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६)/नियम ९(१) अंतर्गत ३० दिवसांची सांविधानिक विक्री सूचना

सदर वरील नमुद तारखेस ई-लिलाव करण्याबाबत सदर कर्जाचे कर्जदार आणि हमीदार यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६)/नियम ९(१) अंतर्गत सूचना सुध्दा समजण्यात यावी.

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींकरिता कृपया पुरविलेली लिंक म्हणजेच **www.unionbankofindia.co.in** किंवा **https://www.ibapi.in, www.mstcecommerce.com** चा संदर्भ घ्यावा.

सही/-

दिनांक : ०८.१२.२०२३ — **प्राधिकृत अधिकारी,**

ठिकाण: मुंबई — **युनियन बँक ऑफ इंडिया**

The spirit of Mumbai is now 94 years old!

www.freepressjournal.in

शुध्दिपत्र

दै. नवशक्तिमध्ये ६/१२/२०२३ रोजी पान क्र. ६ वर छापून आलेल्या शाह अँड नाहर इंडस्ट्रियल प्रिमायसेस (ए-२) को- ऑपरेटीव्ह लि.ने जारी केलेल्या जाहीर सूचनेमधील पहिल्या परिच्छेदातील वरून सातव्या ओळीमध्ये 'युनिट क्र. ३६३' ऐवजी **'युनिट क्र. ३३३'** असे वाचावे.

मुंबई कर्ज वसुली न्यायाधिकरण-II मधील

(वित्त मंत्रालय)

३रा मजला, टेलिफोन भवन, स्ट्रॅण्ड रोड, कुलाबा, मुंबई-४००००५

मूळ अर्ज क्र. २२७ सन २०२३

निशाणी क्र. ११

आयसीआयसीआय बँक लिमिटेड ...**अर्जदार**

विरुध्द

मुला राम आणि अन्य ...**प्रतिवादी**

प्रति,

प्रतिवादी क्र. १

१. मुला राम, प्रौढ, भारतीय रहिवासी, ज्यांचा पत्ता फ्लॅट क्र. ८०२, बिल्डिंग क्र. १२-ए, म्हाडा कॉलनी, सहयोग हॉस्पिटल जवळ, नालासोपारा रोड, विरार पश्चिम, पालघर-४०१३०३.

येथे सुध्दा: फ्लॅट क्र. ३०४, ३रा मजला, राहुल नगर, कुरगाव, जेएसडब्ल्यू कॉलनी जवळ, बोयसर पश्चिम, पालघर, बोयसर-४०१५०१.

येथे सुध्दा: फ्लॅट क्र. ४०४, ४था मजला, राहुल नगर, कुरगाव, जेएसडब्ल्यू कॉलनी जवळ, बोयसर पश्चिम, पालघर, बोयसर-४०१५०१.

येथे सुध्दा: पद्मावती इंजिनियरिंग, गोडाऊन क्र. डब्ल्यू ९२, एमआयडीसी, बोयसर, विरार पश्चिम-४०१५०१.

२. सुगनी देवी, प्रौढ, भारतीय रहिवासी, ज्यांचा पत्ता फ्लॅट क्र. ८०२, बिल्डिंग क्र. १२-ए, म्हाडा कॉलनी, सहयोग हॉस्पिटल जवळ, नालासोपारा रोड, विरार पश्चिम, पालघर-४०१३०३.

येथे सुध्दा: फ्लॅट क्र. ३०४, ३रा मजला, राहुल नगर, कुरगाव, जेएसडब्ल्यू कॉलनी जवळ, बोयसर पश्चिम, पालघर, बोयसर-४०१५०१.

येथे सुध्दा: फ्लॅट क्र. ४०४, ४था मजला, राहुल नगर, कुरगाव, जेएसडब्ल्यू कॉलनी जवळ, बोयसर पश्चिम, पालघर, बोयसर-४०१५०१.

समन्स

ज्याअर्थी **ओ.ए. क्र. २२७ सन २०२३** हा **१५/०६/२०२३** रोजी सन्माननीय पीठासिन अधिकारी/ प्रबंधकांसमोर सूचीबद्ध केला होता.

ज्याअर्थी, सन्माननीय न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. ५८१०७९८.३९/- म्हणजेच रुपये अठ्ठावण्ण लाख दहा हजार सातशे अठ्ठ्याण्णव आणि पैसे एकोणचाळीस मात्र** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओए) समन्स/सूचना जारी केली (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).

ज्याअर्थी साधारण स्वरुपात समन्सची बजावणी परिणामकारक होऊ शकली नाही आणि ज्याअर्थी सन्माननिय न्यायाधिकरणाद्वारे पर्यायी बजावणीकरिता अर्ज संमत करण्यात आला आहे.

ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या तीस दिवसांत कारणे दाखविण्यासाठी.

२. मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे.

३. मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३(ए) अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.

४. तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.

५. व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.

६. तुम्हाला ०५.०२.२०२४ रोजी स. ११.०० वा. लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व प्रबंधकांसमोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने सदर **२८ नोव्हेंबर, २०२३** रोजी दिले.

प्रबंधक

डीआरटी-II, मुंबई

SBI State Bank of India

स्ट्रेस्ड ॲसेटस रिकव्हरी ब्रांच, मुंबई (०५१६८):- ६वा मजला, ''दी इंटरनॅशनल'', १६, महर्षी कर्वे रोड, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.

दूरध्वनी: ०२२-२२०५३१६३/२२०५३१६४/२२०५३१६५ **ईमेल:** sbi.05168@sbi.co.in

स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना जोडपत्र - IV-ए (नियम ८(६) चे परंतुक पहा)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकासह वाचत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसामान्य जनता आणि विशेषकरून कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, स्टेट बँक ऑफ इंडिया, तारणी धनको यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **प्रत्यक्ष कब्जांत** घेतलेल्या तारणी धनकोंकडे गहाण/भारग्रस्त असलेली खाली वर्णन केलेली स्थावर मिळकत यांच्याकडून तारणी धनकोंना येणे थकबाकी असलेल्या **श्री झुल्फिकार असगर मिर्झा आणि सौ ब्युटी बीबी झुल्फिकार मिर्झा यांच्याकडून रु.५०,०२,३८५/- (रुपये पन्नास लाख दोन आणि तीन हजार पंच्याऐंशी मात्र)** च्या वसुलीसाठी **२७.१२.२०२३ रोजीस ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्वावर विकली जाईल. इसारा अनामत रक्कम असेल रु. ७,३०,०००/- (रु. सात लाख तीस हजार मात्र).**

बोलीदारांनी लिलाव तारखेपूर्वी मे. एमएसटीसी लि.ने अवलंब केलेल्या पध्दतीनुसार आवश्यक केवायसी दस्तावेज आणि नोंदणी शुल्क प्रदान करून https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/index.jsp वर स्वत:ची नोंदणी करून घ्यावी.

जाहीर ई-लिलावाची तारीख आणिवेळ आहे २७.१२.२०२३ रोजी स. ११.०० ते सं. ४.०० प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्याद विस्तारासहीत.

मिळकत आयडी नं.	मिळकतीचे तपशील	राखीव किंमत (रु. मध्ये)	इसारा अनामत रक्कम (रु.)	बोली वाढीची रक्कम (रु.)	निरीक्षणाची तारीख आणि वेळ
एसबीआयएन२०००३१२७०२०६	फ्लॅट क्र. १६०३, १६ वा मजला, जे विंग, लेक शोर ग्रीन कासा एलिट, कल्याण शिल रोड, ठाणे, बिल्ट अप एरिया ६४४ चौरस फूट. मिर्झा झुल्फिकार अस यांच्या मालकीचा असलेला सर्व भाग आणि मालमत्तेचे पार्सल. आणि श्रीमती ब्युटी बीबी झुल्फिकार मिर्झा, १ बीएचके ॲडमेजरिंग बिल्ट अप एरिया ६४४ चौरस फूट	रु. ४१,००,०००७- (रु. एकेचाळीस लाख मात्र)	रु. ४,१०,०००/- (रु. चार लाख दहा हजार फक्त)	रु. १०,०००.००	१६.१२.२०२३ स. ११:०० ते दु. १:०० पर्यंत

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, तारणी धनकोंची वेबसाईट मध्ये दिलेली लिंक बघावी **www.sbi.co.in, https://bank.sbi, https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction-notices/sarfaesi-and-others** आणि **https://www.mstcecommerce.com/auctionhome/vibapi/index.jsp, https://ibapi.in किंवा येथे संपर्क साधा सीएलओ संतोष आर चव्हाण, मोबा क्र. ८८७९३३३२३४ आणि सीओ वाल्मिक वाघ मोबा क्र. ८४२४९९८००९**

बँक वेबसाईट www.sbi.co.in या खात्यासाठी मिस्टर झुल्फिकार असगर मिर्झा आणि मिसेस ब्युटी बीबी झुल्फिकार मिर्झा

मालमत्ता आयडी एसबीआयएन२०००३१२७० २०६ साठी ई-लिलाव वेबसाइट शोध

मिळकत ठिकाण

मिळकतीचा फोटो

मिळकतीचा व्हिडिओ

मिळकतीची युएसपी

दिनांक : ०७.१२.२०२३ — सही/-

ठिकाण: मुंबई — प्राधिकृत अधिकारी, स्टेट बँक ऑफ इंडिया

शेरा : घरगुती सामान तारण मत्तेच्या भाग नसून सदर लिलावाचा भाग नाही आहे

शुध्दीपत्र

ICICI Bank

शाखा कार्यालय : आयसीआयसीआय बँक लि., ऑफिस नंबर २०१-बी, २ रा मजला, रोड नं. १, प्लॉट नं. बी३, वायफाय आयटी पार्क, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र - ४००६०४

आयसीआयसीआय बँक लि., कडील तुमचे उपरोक्त गृह कर्ज खाते क्र. **एलबीएमयुएम००००४८७३५७४** आणि कर्जदारांचे नाव **मानसी अविनाश पाटील** करिता **जून २५, २०२१** दिनांकीत उक्त सरफैसी १३(२) सूचनेच्या (ह्यानंतर उल्लेख 'सदर सूचना') संदर्भात हे आहे, आम्ही कळवू इच्छितो की, अनावधानाने आणि निर्हेतुकपणे मिळकतीचा पत्ता चुकून **फ्लॅट क्र. ३०१ ३रा मजला पटेल प्रयोशा प्रमुख सदन विंग-डी प्लॉट क्र. ०३ गाव जवसई अंबरनाथ पश्चिम १ ठाणे- ४२१५०१. (मोजमापित क्षेत्र चटई क्षेत्र ३२१ चौ. फू.)** येथे स्थित असा नमूद केला आहे. त्या ऐवजी **फ्लॅट क्र. ३०१, ३रा मजला, पटेल प्रयोशा प्रमुख सदन, विंग-डी, प्लॉट क्र. ०३, सर्व्हे क्र. ३९ ए, जुना हिस्सा क्र. १, नविन हिस्सा क्र. १ए, गाव जवसई, अंबरनाथ पश्चिम १ ठाणे- ४२१५०१. (मोजमापित क्षेत्र चटई क्षेत्र ३२१ चौ. फू.)** असा आहे, म्हणून तुम्ही कृपा करून **फ्लॅट क्र. ३०१, ३रा मजला, पटेल प्रयोशा प्रमुख सदन, विंग-डी, प्लॉट क्र. ०३, सर्व्हे क्र. ३९ ए, जुना हिस्सा क्र. १, नविन हिस्सा क्र. १ए, गाव जवसई, अंबरनाथ पश्चिम १ ठाणे- ४२१५०१. (मोजमापित क्षेत्र चटई क्षेत्र ३२१ चौ. फू.)** असे वाचावे.

सदर सरफैसी १३(२) सूचनेत वर्णन केलेले इतर सर्व तपशील आहेत तसेच राहतील.

ह्या बाबतीत तुमच्या झालेल्या गैरसोयीबद्दल आम्ही मनापासून दिलगीर आहोत.

दिनांक :डिसेंबर ०८, २०२३ — **प्राधिकृत अधिकारी**

ठिकाण : महाराष्ट्र — **आयसीआयसीआय बँक लिमिटेड**

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

स्ट्रेस्ड ॲसेट मॅनेजमेंट ब्रांच

१०४, तळ मजला, भारत हाऊस. मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई-४०००२३

इमेल आयडी : samvmumbai@unionbankofindia.bank

विक्रीबाबत कर्जदारांना कळविणारी सूचना (३० दिवसांची सूचना)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २०२२ च्या नियम ८(६)

दिनांक: ३०.११.२०२३

प्रति,

१. मे. हॉटेल होरायझन प्रा. लि. (कर्जदार), ३७, जुहू बीच, जुहू चर्च समोर, जुहू, मुंबई-४०००४९.

२.श्री. सागर शर्मा (प्रवर्तक/ हमीदार) ए) ३७, जुहू बीच, जुहू चर्च समोर, जुहू, मुंबई-४०००४९.
बी) १००१ आणि १००२, १०वा मजला फ्लोरेन्स साऊथ ॲव्हेन्यू, खार पश्चिम, खार स्टारबक्स समोर, मुंबई-४०००५२.

३.श्री. विशाल शर्मा (प्रवर्तक/ हमीदार) ए) ३७, जुहू बीच, जुहू चर्च समोर, जुहू, मुंबई-४०००४९.
बी) १००१ आणि १००२, १०वा मजला फ्लोरेन्स साऊथ ॲव्हेन्यू, खार पश्चिम, खार स्टारबक्स समोर, मुंबई-४०००५२. **सी)** सिल्व्हर स्प्रिंग, फ्लॅट क्र. १४०१, शिर्ली राजन रोड, रिझवी कॉम्प्लेक्स, वांद्रे पश्चिम, मुंबई-४०००५०.

महोदय/महोदया,

विषय: सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत बँकेच्या थकबाकीच्या वसुलीकरिता मे. हॉटेल होरायझन प्रा. लि. च्या मालकीच्या खालील परिशिष्ट मिळकतीची विक्री.

युनियन बँक ऑफ इंडिया, आयएफबी शाखा, मुंबई, तारण धनको यांनी त्यातील विहित वेळेत थकबाकी चुकती करण्यासाठी तुम्हाला बोलाविण्यासाठी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत दिनांक ०१.११.२०१८ रोजीची मागणी सूचना जारी केली होती. तुम्ही विहित कालावधीत सदर सूचनेचे पालन करण्यास कसूर केल्यामुळे प्राधिकृत अधिकाऱ्यांनी २०.०१.२०२३ रोजी ॲक्टच्या कलम १३(४) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ अंतर्गत स्थावर तारण मत्तेचा कब्जा घेतला.

तारण मत्तेचा कब्जा घेतल्यानंतरही तुम्ही बँकेला थकबाकी रक्कम चुकती केली नाही त्यामुळे ऑनलाईन माध्यमाने सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसानंतर जाहीर ई-लिलाव करुन खालील नमुद मिळकतीची विक्री करणे आवश्यक बनले आहे. सेवा पुरवठादारांचा पतशिल आणि मिळकतीच्या राखीव किंमतीसह ई-लिलावाची तारीख आणि वेळ जेव्हा ई-लिलाव करण्यात येणार आहे तुम्हाला वेगळी कळविण्यात येईल.

त्यामुळे जर तुम्ही विक्री सूचनेच्या तारखेपूर्वी बँकेची थकबाकी रकमेसह त्यानंतरचे व्याज, बँकेने केलेला परिव्यय, प्रभार आणि खर्च चुकता केला तर मिळकतीच्या विक्रीसाठी पुढील कारवाई करण्यात येणार नाही आणि तुम्ही ॲक्टच्या कलम १३(८) मध्ये विहित नुसार तुमची मिळकती विमोचित करु शकता.

मिळकतीचे परिशिष्ट

स्थावर मिळकतीचे वर्णन

मुंबई उपनगरच्या जिल्ह्यातील वांद्रेच्या नोंदणी उपजिल्ह्यातील जुहू तारा येथे स्थित, वसलेल्या आणि अशा मोजमापित अंदाजे ७५५४.८० चौ.मी. (प्रॉपर्टी कार्डनुसार) सर्व्हे क्र. ३७, हिस्सा क्र. ३ आणि संलग्न सीटीएस क्र. ५६०, ५६०/३ ते ५६०/६ धारक जमिनीचे सर्व ते भाग किंवा विभाग.

वर नमूद मिळकत खालीलप्रमाणे सीमाबध्द आहे: **उत्तरेला द्वारे सीमबध्द:** बलराज साहनी रोड, **दक्षिणेला द्वारे सीमबध्द:** किंग्स हॉटेल, **पूर्वेला द्वारे सीमबध्द:** : जुहू चर्च रोड, **पश्चिमेला द्वारे सीमबध्द:** : जुहू बीच

ठिकाण: मुंबई — **सही/-**

दिनांक : ३०.११.२०२३ — **प्राधिकृत अधिकारी,**

युनियन बँक ऑफ इंडिया

(सुमित तिवारी, मुख्य व्यवस्थापक)

सेंट्रल बँक ऑफ इंडिया सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया Central Bank of India

ठाणे (पूर्व) शाखा

सर्व सेवा समिती, शिवलीला हाऊस, साधु बसवानी रोड,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)-४००६०३. फोन : २५३२६०३७.

कब्जा सूचना

प्रति,

श्री. संजय शामजीभाई राजपूत (कर्जदार म्हणुन)

सौ. रेखा संजय राजपूत (सहकर्जदार म्हणुन)

पत्ता:

शिव प्रसाद बिल्डिंग, २रा मजला, खोली क्र. २०२, साई बाबा मंदिर जवळ, काल्हेर, भिवंडी, ठाणे-४२१३०२.

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी म्हणुन सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (ॲक्ट ५४ सन २००२) अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसात **रु. ४४२९४३.१६/- (रुपये चार लाख बेचाळीस हजार नऊशे त्रेचाळीस आणि पैसे सोळा मात्र)** अशी सूचनेत नमुद केलेली रक्कम चुकती करण्यासाठी कर्जदार **श्री. संजय शामजीभाई राजपुत** आणि **सौ. रेखा संजय राजपुत, शिव प्रसाद बिल्डिंग, २रा मजला, खोली क्र. २०२, साई बाबा मंदिर जवळ, काल्हेर, भिवंडी, ठाणे-४२१३०२** यांना बोलाविण्यासाठी सदर ॲक्टच्या कलम १३(२) अंतर्गत दिनांक **११/०७/२०२३** रोजीची मागणी सूचना जारी केली होती.

येथील वरील नमुद कर्जदारांनी रक्कम चुकती करण्यास कसूर केली आहे, म्हणुन येथील वरील नमुद कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी ०५ डिसेंबर, २०२३ रोजी सदर ॲक्टच्या कलम १३(४) सहवाचता सदर नियमावलीच्या नियम ८ अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा घेतला आहे.

विशेषत: येथील वरील नमुद कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, सदर मिळकतीसह व्यवहार करु नये आणि सदर मिळकतीसह केलेला कोणताही व्यवहार हा **रु. ४४२९४३.१६/- (रुपये चार लाख बेचाळीस हजार नऊशे त्रेचाळीस आणि पैसे सोळा मात्र)** आणि त्यावरील व्याज या रकमेकरिता सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाच्या प्रभाराच्या अधीन राहील.

कर्जदारांचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळ मर्यादेच्या संदर्भात ॲक्टच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन

फ्लॅट क्र. ११०, मजला १ला, बिल्डिंग क्र. ई-२, साईधाम कॉम्प्लेक्स, सर्व्हे क्र. १९४/६, गाव पुर्णा, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे-४२१३०२

दिनांक : ०५/१२/२३ — **सही/-**

ठिकाण : ठाणे — **प्राधिकृत अधिकारी**

फॉर्म बी

जाहीर उद्घोषणा

(द इन्सॉल्वन्सी ॲण्ड बँक्रप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (लिक्विडेशन प्रोसेस) रेग्युलेशन्स २०१६ च्या रेग्युलेशन १२)

मे. बिल एनर्जी सिस्टम्स लिमिटेडच्या

स्टेकहोल्डर्सच्या माहितीसाठी

अ. क्र.	वर्णन	तपशील
१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	**बिल एनर्जी सिस्टम्स लिमिटेड**
२	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	०४-०२-२०१०
३	कॉर्पोरेट कर्जदार ज्या अंतर्गत स्थापित/ नोंदणीकृत आहे ते प्राधिकरण	कंपनीचे निबंधक (आरओसी) - मुंबई
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर/कॉर्पोरेट कर्जदाराना लिमिटेड लायबिलीटी आयडेंटिफिकेशन क्र.	एल२८९९५एमएच२०१०पीएलसी१९९६९१
५	कॉर्पोरेट कर्जदाराचे नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय (असल्यास) ह्यांचा पत्ता	बी-११, विरल शॉपिंग सेंटर, मंत्रीवाडी साईनाथ रोड, मालाड (पश्चिम), मुंबई शहर, महाराष्ट्र, ४०००६४, भारत
६	कॉर्पोरेट कर्जदाराच्या बाबतीत नादारी प्रक्रिया बंद होण्याची तारीख	०३-१२-२०२३
७	नादारी निर्णय प्रक्रिया सुरू होण्याची तारीख	०४-१२-२०२३ (आदेश ०५-१२-२०२३ रोजी उपलब्ध करून दिला)
८	परिसमापक म्हणून कृती करणारे नादारक व्यवसायिक नाव आणि नोंदणीकृत क्रमांक	**मधुसुदन राव गोनुगुंटा** आयबीबीआय रजि. क्र. आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी००१८१/२०१७-१८/१०३६०
९	मंडळात नोंदणीकृत असलेला समापकाचा पत्ता आणि इमेल	७-१-२८५, फ्लॅट क्र. १०३, श्री साई स्वप्नसंपदा अपार्टमेंट्स, बालकामपेट, संजीव रेड्डी नगर, हैदराबाद, तेलंगणा, ५०००३८ **ईमेल आयडी: madhucs1@gmail.com**
१०	समापकासह पत्रव्यवहार करण्यासाठी असलेला पत्ता आणि इ-मेल	**cirpbel@gmail.com**
११	दावे सादर करण्याची अंतिम तारीख	**०३-०१-२०२४**

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, सन्माननिय राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई ने **०४-१२-२०२३** रोजी **बिल एनर्जी सिस्टम्स लिमिटेड** च्या विरोधात नादारी प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश दिला आहे.

बिल एनर्जी सिस्टम्स लिमिटेड च्या स्टेकहोल्डर्सना बाब क्र. १० च्या समोरील पत्त्यावर परिसमापकांकडे **०३-०१-२०२४** रोजी किंवा पूर्वी त्यांचे दावे सादर करण्यासाठी याद्वारे बोलाविण्यात येत आहे.

वित्तीय धनकोंनी त्यांच्या पुरावेसहित दावे केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सादर करावेत. सर्व इतर धनकों, व्यक्तिशः, टपालाद्वारे वा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्यांच्या पुरावेसहित दावे सादर करू शकतात.

चुकीचे, दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड होऊ शकेल.

सही/- मधुसुदन राव गोनुगुंटा, परिसमापक

आयबीबीआय रजि. क्र. आयबीबीआय/आयपीए-००१/

आयपी-पी००१८१/२०१७-१८/१०३६०

एएफए १२ सप्टें. २०२४ पर्यंत वैध

दिनांक: ०९-१२-२०२३ — **cirpbel@gmail.com (प्रक्रिया विशिष्ट)**

ठिकाण: हैदराबाद — **सेल क्र. ९१७७७१५५५८ आणि ८०७४६३३५०२**

सेंट्रल बँक ऑफ इंडिया सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया Central Bank of India

ठाणे (पूर्व) शाखा

सर्व सेवा समिती, शिवलीला हाऊस, साधु बसवानी रोड,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)-४००६०३. फोन : २५३२६०३७.

कब्जा सूचना

प्रति,

नामदेव नारायण मोरे (कर्जदार म्हणुन)

सौ. नेहा नामदेव मोरे (सहकर्जदार म्हणुन)

पत्ता:

खोली क्र. १, तळ मजला, साठेवाडी ज्ञान साधना कॉलेज, साई बाबा मंदिर मागे, मेंटल हॉस्पिटल जवळ, ठाणे पश्चिम.

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी म्हणुन सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (ॲक्ट ५४ सन २००२) अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसात **रु. ६,८४,८७७/- (रुपये सहा लाख चौऱ्याऐंशी हजार आठशे सत्त्याहत्तर मात्र)** अशी सूचनेत नमुद केलेली रक्कम चुकती करण्यासाठी कर्जदार **श्री. नामदेव नारायण मोरे** आणि **सौ. नेहा नामदेव मोरे, खोली क्र. १, तळ मजला, साठेवाडी ज्ञान साधना कॉलेज, साई बाबा मंदिर मागे, मेंटल हॉस्पिटल जवळ, ठाणे पश्चिम** यांना बोलाविण्यासाठी सदर ॲक्टच्या कलम १३(२) अंतर्गत दिनांक **०६/०५/२०२३** रोजीची मागणी सूचना जारी केली होती.

येथील वरील नमुद कर्जदारांनी रक्कम चुकती करण्यास कसूर केली आहे, म्हणुन येथील वरील नमुद कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी ०५ डिसेंबर, २०२३ रोजी सदर ॲक्टच्या कलम १३(४) सहवाचता सदर नियमावलीच्या नियम ८ अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा घेतला आहे.

विशेषत: येथील वरील नमुद कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, सदर मिळकतीसह व्यवहार करु नये आणि सदर मिळकतीसह केलेला कोणताही व्यवहार हा **रु. ६,८४,८७७/- (रुपये सहा लाख चौऱ्याऐंशी हजार आठशे सत्त्याहत्तर मात्र)** आणि त्यावरील व्याज या रकमेकरिता सेन्ट्रल बँक ऑफ इंडियाच्या प्रभाराच्या अधीन राहील.

कर्जदारांचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळ मर्यादेच्या संदर्भात ॲक्टच्या कलम १३(८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन

फ्लॅट क्र. २११, मजला २रा, विंग डी,, साईधाम कॉम्प्लेक्स, सर्व्हे क्र. १९४/६, गाव पुर्णा, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे-४२१३०२.

दिनांक : ०५/१२/२३ — **सही/-**

ठिकाण : ठाणे — **प्राधिकृत अधिकारी**

प्रपत्र क्र. १६ (विनियमन ३४(३) पाहावे)

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)

१ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्सचेंज इमारत, सेक्टर-३०ए, वाशी, नवी मुंबई-४००७०३

आरपी क्र. ७० सन २०१८

रिकव्हरी ऑफ डेब्टस ॲण्ड बँकरप्टसी ॲक्ट, १९९३ सहवाचता आयकर अधिनियम, १९६१ च्या दुसऱ्या परिशिष्टाच्या नियम ४८ अंतर्गत स्थावर मिळकतीच्या जप्तीचे वॉरंट

पेगासस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि.

विरुध्द

श्री. प्रकाश नारायण फडके आणि इतर

प्रति,

(सीडी १) श्री. प्रकाश नारायण फडके

(सीडी २) सौ. वैजंती प्रकाश फडके

दोन्ही सीडी पत्ता येथे फ्लॅट क्र. २०३- संस्कार अपार्टमेंट, प्लॉट क्र. १३, सेक्टर-१२, सी.के.पी कॉलेज जवळ, न्यू पनवेल (पश्चिम), खांदा कॉलनी, नवी मुंबई-४१०२०६.

येथे देखील: फ्लॅट क्र. १०१ आणि २०१, मारूती अपार्टमेंट, प्लॉट क्र. ७६०, सेक्टर क्र. १, शिरवणे गाव, नेरूळ, नवी मुंबई-४००७०६

येथे देखील (प्रतिवादी क्र. १ साठी फक्त) चितामणी कार्टरर्स, फ्लॅट क्र. २०४, संस्कार अपार्टमेंट, प्लॉट क्र. १३, सेक्टर क्र.१२, सी.के.पी कॉलेज जवळ, न्यू पनवेल (पश्चिम), खांदा कॉलनी, नवी मुंबई-४१०२०६

येथे देखील (प्रतिवादी क्र. २ साठी फक्त) व्ही पी कार्टरर्स, फ्लॅट क्र. २०४, संस्कार अपार्टमेंट, प्लॉट क्र. १३, सेक्टर क्र.१२, सी.के.पी कॉलेज जवळ, न्यू पनवेल (पश्चिम), खांदा कॉलनी, नवी मुंबई-४१०२०६

ज्याअर्थी तुम्ही (सी.डी.) कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३) **च्या** सन्माननीय पीठासिन अधिकारी यांनी काढलेल्या प्रमाणपत्र क्र. आरसी/७०/२०१८ च्या संदर्भात तुमच्याद्वारे देय आर.सी. नुसार **रु. १६,६१,४१८.६३ (रुपये सोळा लाख एकसष्ठ हजार चारशे अठरा आणि त्रेसष्ठ पैसे मात्र)** सह १९.११.२०१३ पासून वसुली पर्यंत ९.५०% सरळ व्याज वार्षिक सह दंडात्माक व्याज आणि पुढील व्याज आणि खर्च ही रक्कम चुकती करण्यास कसूरवार ठरले आहेत.

तुम्हाला याद्वारे कोणत्याही बाबतीत खालील नमूद मिळकतीसह व्यवहार किंवा कब्जा, प्रभारासह हस्तांतर, अन्यसंक्रमण, तिसऱ्या पक्षाचा हितसंबंध निर्माण करणे, वाटप करण्यापासून पुढील आदेशापर्यंत प्रतिबंध आणि मनाई करण्यात येत आहे आणि की सर्व व्यक्तींना असे हस्तांतर, अन्यसंक्रमण, कब्जा किंवा प्रभारान्वये कोणताही लाभ घेण्यापासून मनाई करण्यात येत आहे.

मिळकतीचे वर्णन

फ्लॅट क्र. १०१/२०१, मारूती अपार्टमेंट, प्लॉट क्र.७६०, सेक्टर - १, शिरवणे, गाव नेरूळ, नवी मुंबई.

माझे हस्ते आणि न्यायाधिकरणाचे शिक्क्यानिशी २२.०८.२०२३ रोजी दिली.

सही/- (दीपा सुब्रमण्यम)

वसुली अधिकारी - I,

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)

महाराष्ट्र शासन

अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे प्राधिकरण

पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१

EMAIL ID-addcollmumbai@gmail.com PH. No-(०२२) २२६१००१३

जाहीर नोटीस

श्री. साजिद यासिन कडीवाला ... **अपिलार्थी**

विरुध्द

उपजिल्हाधिकारी (अति/निष्का)
कुलाबा विभाग
सक्षम प्राधिकारी-१
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ... **प्रतिवादी**

प्रति,

श्री. जहांगीर अब्दुल बारी शेख,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर कफपरेड, कुलाबा,
मुंबई-४०० ००५. ...**(प्रतिवादी क्र. २)**

सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणांस सूचित करण्यात येते की, अपिलार्थी **श्री. साजिद यासिन कडीवाला** यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३५ अंतर्गत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर, पहिला मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१. येथे झोपडीवर नावात बदल करणेकामी अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर झोपडी आपणाकडून खरेदी केल्याने, त्यांनी आपणांस सदर अपील प्रकरणी प्रतिवादी क्र. २ केले आहे. प्रकरणी घेण्यात आलेल्या दि. १०.१०.२०२३ रोजीच्या सुनावणीत मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांनी आपणांस पुढील सुनावणी तारखेबाबत जाहीर नोटीसीद्वारे अवगत करणेचे निर्देश दिले आहे. सदर प्रकरणी **पुढील सुनावणी दि. १९.१२.२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता** निश्चित केली आहे.

आपण सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. ०२ असून, सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास सूचीत करण्यात येते की, आपण नियोजित **सुनावणी दि. १९.१२.२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता** मा. अपर जिल्हाधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी, मुंबई शहर यांचे दालनात उपस्थित/हजर राहून, आपली बाजू मांडावी. उपरोक्त नमूद केलेल्या दिवशी आपण स्वत: अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास, आपणास काहीही सांगावयाचे नाही, असे गृहित धरून प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-

अव्वल कारकून,

अपर जिल्हाधिकारी कार्यालय,

मुंबई शहर

कर्ज वसुली न्यायाधिकरण क्र. २, मुंबई मध्ये

२ रा मजला, टेलिफोन भवन, कोलाबा मार्केट, कोलाबा, मुंबई-४०० ००५

मूळ अर्ज क्र. १३५ सन २०२३

अंतर्गत — **नि. १५**

आयए क्र. १५२९ सन २०२३

समन्स

एचडीएफसी बँक लि. ... अर्जदार

वि.

मे. प्रणाली प्रियांका एंटरप्रायजेस ... प्रतिवादी

ज्याअर्थी, **१३ ऑक्टोबर, २०२३** रोजी प्रबंधक, डीआरटी-२, मुंबई यांच्यासमोर ओ.ए. क्र. १३५/२०२३ सूचिबध्द केला होता, तेव्हा अर्जदारांनी त्यात सांगितल्याप्रमाणे अंतरिम अनुतोषांसाठी आय.ए. क्र. १५२९ सन २०२३ सादर केला आणि अन्य पक्षकारांवर सदर आयए क्र. १५२९ सन २०२३ ची बजावणी करण्यासाठी वेळ मागितला.

ज्याअर्थी, अर्जदारांनी प्रतिवादी क्र. १ आणि २ वर स्पीड पोस्ट/ए.डी. ने सदर आयए क्र. १५२९ सन २०२३ ची बजावणी करण्याचा प्रयत्न केला परंतु १२ ऑक्टोबर, २०२३ दिनांकित बजावणी प्रतिज्ञापत्राद्वारे नोंदीवर घेतलेल्या टपाल अभिप्राय ''बाब वस्तु परत केल्या, प्रेषिती न सांगता सोडून गेले'' सह परत केला (नि. १२).

ज्याअर्ती, अर्जदारानी **१३ ऑक्टोबर, २०२३** रोजी नामदार प्रबंधक, डीआरटी-२, मुंबई यांच्यासमोर आय.ए. क्र. १५२९ सन २०२३ सादर केला आणि फ्री प्रे जर्नल (इंग्रजी) व नवशक्ति (मराठी) ह्या स्थानिक वर्तमानपत्रात ही सूचना प्रकाशित करून प्रतिवादी क्र. १ व २ वर बजावणी करण्यास वेळ मागितला, ज्यास ह्या न्यायाधिकरणाने अनुमती दिली.

म्हणून, तुम्ही **८ जानेवारी, २०२४ रोजी स. ११.०० वा.** रजिस्ट्रार, डीआरटी-२, मुंबई समोर व्यक्तीश: किंवा एका वकिलामार्फत हजर राहून तुमचे उत्तर सादर करणे आवश्यक आहे, कसूर केल्यास सदर आयएज वर तुमच्या गैरहजेरीत सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या **१६ ऑक्टोबर, २०२३** रोजी दिले.

शिक्का

सही/-

रजिस्ट्रार

डीआरटी-II, मुंबई

सर्व प्रतिवादींचे नाव आणि पत्ता

१. **मे. प्रणाली प्रियांका एंटरप्रायजेस,**
एक सोल प्रोप्रायटरी संस्था, तर्फे सोल प्रोप्रायटर नी. नैलेश छेडा, **ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय आहे:** २०४, व्ही मॉल, साईधाम टेंपलजवळ, आशा नगर, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, कांदिवली (पूर्व), मुंबई-४०० १०१. **ज्यांच्या व्यवसायाची जागा:** स्टॉक यार्ड आरएसबी इंडस्ट्रीज, महिंद्र अँड महिंद्र लिमिटेड जवळ, लालपूर, रुद्रपूर-२६३१४८, उत्तराखंड.

२. **श्री. नैलेश छेडा**
५७, सहकार बिल्डिंग, अजमल रोड, ऑफ मालविय रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७.